# संत रविदास महाराज

(सुमारे पंधरावे-सोळावे शतक)

(अल्प परिचय)

"रैदास" या नावाने प्रसिद्ध. उत्तर भारतातील एक मध्ययुगीन संत. महाराष्ट्रात रोहिदास म्हणून ओळखले जाणारे संत हेच असावेत, असे दिसते. ते काशीचे राहणारे होते. त्यांच्या वडिलांचे नाव राहू, आईचे नाव करमा व पत्नीचे नाव लोना होते. त्यांना विजयदास नावाचा पुत्र असल्याचा उल्लेख परमानंदस्वामिरचित *रविदास पुराण* ह्या ग्रंथात आढळतो.

सत्संगतीचा परिणाम होऊन ते बाराव्या वर्षापासूनच राम व सीता यांच्या मूर्तीची पूजा करू लागले. रविदास यांची पदे ग्रंथसाहिबमध्ये आढळतात. त्यांच्या रचनाचा एकसंग्रह प्रयागहून "*रैदासजी की बानीया*" प्रकाशित झाला आहे. संत रविदास हे संत कबीर यांचे समकालीन असल्याचा उल्लेख आढळतो. मीराबाईंनी आपल्या अनेक पदांतून रविदास हे आपले गुरु असल्याचे म्हटले आहे.

भक्तीसाठी परमवैराग्याची आवश्यकता आहे, असे ते मानत असत. अनिर्वचनीय, एकरस, अक्षर व अविनाशी असे परमतत्त्व हेच सत्य असून ते प्रत्येक जीवामध्ये अवस्थित असते, असा तत्त्वज्ञानविषयक विचार त्यांनी मांडला आहे. त्यांचे सदाचरण व आध्यात्मिक साधना पाहून सर्व वर्णांचे लोक आपला वर्णाहंकार विसरून त्यांच्यापुढे नम्र होत असत. ते १२० वर्षांवर जगले, असे मानले जाते. त्या वेळचे एक प्रसिद्ध महात्मा म्हणून कबीरांनीही (संतनिमें रविदास संत) त्यांना गौरविले. नाभादास, प्रियादास, धन्ना भगत, मीराबाई इ. संतांनीही त्यांचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे. त्यांनी प्रवर्तित केलेला पंथ -रैदासी पंथ॰ म्हणून प्रसिद्ध होता. महाराष्ट्र , गुजरात, पंजाब, राजस्थान या प्रदेशांत या पंथाचे अनुयायी आढळतात.

*****

स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ